# भूमिगत मुंबई मेट्रो-३ चा पहिला टप्पा जुलैपासून?

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबईतील पहिल्या भूमिगत मेट्रोमधून प्रवास करण्याचे मुंबईकरांचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार असून मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने पहिल्या टप्प्याची एकात्मिक चाचणी प्रक्रिया पूर्ण केली आहे. आता संशोधन डिझाइन आणि मानक संस्थाची (आरडीएसओ) चाचणी जूनच्या पहिल्या आठवड्यात झाल्यानंतर जुलैपर्यंत सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण होतील आणि मुंबईकर भूमिगत मेट्रोत बसतील असा अंदाज आहे.

मेट्रो - ३ कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्यांत आरे कॉलनी आणि बीकेसी दरम्यान गेल्या वर्षाच्या अखेरीपासून ट्रायल रन सुरू आहे. पहिल्या टप्प्यात ९ गाड्यांसह मेट्रो सेवा सुरू होणार आहे. याअंतर्गत सर्व गाड्यांची तपासणी ही पूर्ण झाली आहे. एमएसआरसीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, चाचणी दरम्यान, मेट्रोचा वेग, यंत्रणा, सुरक्षा आणि रोलिंग स्टॉक तपासला जातो. आरडीएसओकडून प्रमाणपत्र मिळाल्यानंतर, अंतिम चाचणीसाठी अर्ज केला जाईल. जुलैपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित आहे.

एमएसआरसीने आरे कॉलनीत मेट्रो कारशेड तयार करण्याचे कामही जवळपास पूर्ण केल्याने मेट्रोच्या डब्यांच्या देखभालीचा प्रश्न सुटला आहे. दुसऱ्या टप्प्यात मेट्रो सेवा सुरू करण्यासाठी अतिरिक्त ११ मेट्रो ट्रेन मुंबईत पोहोचल्या आहेत. अतिरिक्त ११ गाड्यांच्या चाचणीचे कामही सुरू करण्यात आले आहे.



## कुलाबा-वांद्रे-सिप्झ २७ स्थानके

● कफ परेड, विधानभवन, चर्चगेट, चर्चगेट मेट्रो, हुतात्मा चौक, सीएसटी मेट्रो, काळबादेवी, गिरगाव, ग्रँन्ट रोड मेट्रो, मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी मेट्रो, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक, वरळी, सिद्धीविनायक मंदिर, दादर मेट्रो दादर, शितलादेवी मंदिर, धारावी, बीकेसी, विद्यानगरी, सांताक्रुझ, सीएसआयए डॉमेस्टिक एअरपोर्ट, सहार रोड, सीएसआयए इंटरनॅश्नल एअरपोर्ट, मरोळ नाका, एमआयडीसी आणि सिप्झ व्हीलेज.

## 'या' वेळेत धावणार मेट्रो

● आरे-बीकेसी मार्गावर मेट्रो सुरू झाल्यानंतर येथे सुमारे ९ मेट्रो ट्रेन धावणार आहेत. यापैकी फक्त दोनच मेट्रो ट्रेन देखभाल आणि स्टँडबायसाठी ठेवण्यात येणार आहेत. या मेट्रो ट्रेन सकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत धावेल. एक्वा लाइन कॉरिडॉर ३३.५ किमी पर्यंत विस्तारित आहे. या मार्गावर एकूण १० स्थानके असून दररोज सुमारे २६० राउंड-ट्रिप सेवा उपलब्ध असतील.